# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट :- ४०५/२०२३ दिनांक – २७/११/२०२३

## एक महीला वेश्यादलाल हीस अटक करुन दोन पीडीत महीलांची सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रति. कक्ष नालासोपारा यांना यश

वालीव पोलीस ठाण्याचे हद्दीत रेंज नाक्याजवळ वसई पुर्व येथे एक महीला वेश्यादलाल वेश्यागमननाकरीता दोन मुली घेवुन येणार असल्याची गोपनीय माहीती मिळाल्यावरुन पोलीस निरीक्षक संतोष चौधरी यांनी सदरची माहीती सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांना दिली. त्यानुसार पो.नि. संतोष चौधरी, पोलीस स्टाफ, बोगस गि-हाईक व दोन पंचासह जावुन छापा टाकला त्यामध्ये एक महीला वेश्यादलाल आरोपीत नामे राबीया इकबाल पठाण वय ३० वर्षे रुम नं.१११ बिल्डींग नं.३४/बी नटवर पारेख कंम्पाउंट जीएम लिंक रोड, इंडीयल ओयल नगर शिवाजी नगर गोवंडी मुंबई -४३ हिस ताब्यात घेवुन दोन पिडीत महीला यांची वेश्याव्यवसायातुन सुटका केली आहे.

सदर बाबत थोडक्यात हकीकत अशी कि,यातील वेश्यादलाल नामे- **राबीया इकबाल पठाण वय ३० वर्षे** हिने पिडीत महीला १) **वय- २५ वर्षे** व २) **वय ३८ वर्षे** यांना पैशाचे आमिष दाखवुन त्याचेकडून वेगवेगळया ग्राहकांना वेगवेगळया ठिकाणी बोलावुन त्यांचेकडुन एका महीलेचे १५०००/- प्रमाणे पैसे घेवुन पिडीत महीलांना वेश्याव्यवसाय करण्यास लावते व त्याचा मोबदला म्हणुन पिडीत महीलांना ३०००/- रु.देत असते व ग्राहकाकडुन मिळणाऱ्या पैशातुन उर्वरीत रक्कम ती स्वतःकडे ठेवून घेत असे. तरी सदर दोन पिडीत महीला यांची वेश्याव्यवसायाच्या दलदलीतून सुटका करुन नमूद महीला दलाल आरोपी हिस अटक करुन तिचेविरुध्द वालीव पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं.८७५/२०२३ भादविस कलम ३७०(१)(३),३४ सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४,५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस उपआयुक्त (गुन्हे) श्री अविनाश अंबुरे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पो.नि. संतोष चौधरी, पो.हवा. बापु पवार, रोशन नारायण किणी, म.पो.हवा. साक्षी डोइफोडे, पो.हवा.महेंद्र पुंडलिक शेटये, म.पो.अं. काजल प्रदीप पाटील, चा.पो.हवा. सुनिल विष्णु पागी,सर्व नेम. अनै.मा.वा. प्र.कक्ष नालासोपारा यांनी केली आहे.